## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/१०/२०१७

**१) घराचा ताला तोडुन लोखंडी आलमारीतुन सोन्या चांदीचे दागीण्यांची चोरी . :–**

दिनांक १५/१०/२०१७ चे १०.०० ते १६/१०/२०१७ वा. दरम्यान यातील फिर्यादी राजेन्द्र उमेशचंद्र दहलवार वय ५२ वर्ष, रा. विवेकानंद पॉलेटेक्नीकल कॉलेज क्वार्टर सितांसावंगी हे घराला कुलुप लावुन ग्रामपंचायत निवडणुक कर्तव्यावर गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने मागील टेकलेल्या दारास ढकलुन घराचे आत प्रवेश करुन लोखंडी आलमारीतील सोन्याचे मंगळसुत्र २ नग ४० ग्रॅम सोन्याची अंगठी, ३ नग १० ग्रॅम, सोन्याचा हार, ३० ग्रॅम, चांदीचा करदंड १ नग ३० ग्रॅम, चांदीचे पायजन, १ नग ३० ग्रॅम चांदीची पायल, १ नग २० ग्रॅम चांदीचा करदोळा १० ग्रॅम, व नगदी व ३,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**२) अज्ञात चोराने नगदी पैसे व सामानाची चोरी . :–**

दिनांक १५/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कमलेश खेमुप्रसाद दुबे वय २८ वर्ष, रा. देव्हाळा बु. यांचे मकानाचे समोरील दार ढकलुन घरात प्रवेश करुन घरात ठेवलेली टिनाची पेटी कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली, टिनाचे पेटीत नगदी १४,०००/–रु. २ नग नविन धोतर, २ नग नविन कुर्ते, ३ नग दुप्पटे असा एकुण १५०५०/–रु. चा माल चोरुन फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**३) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे १९.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात बोलुन फिर्यादीचा उजवा हात पकडुन 'तु माझ्या सोबत नाचायला चल' असे बोलुन आरोपीने फिर्यादीचा उजवा हात धरुन ओढले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(अ)(१) भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फुकट पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/१०/२०१७ चे २३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी खाटेवर झोपली होती वतीचा मुलगा गावात फिरण्यास गेला असता व दार टेकलेला होता यातील आरोपीने विनयभंग करुन पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३५४(अ)(१) भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**५) मा. जिल्हाधिकारी सा. भंडारा यांचे आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे १६.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी व अंदाजे १०० लोकांनी ग्रा.पं. निवडणुक विजयी उमेदवार पक्षा तर्फे बिना परवानगीने विजयी मिरवणुका गावात काढुन बॅन्ड वाजा वाजवुन गावातुन पराजीत उमेदवाराच्या घरा समोर रोडवर कपबशी फोडुन त्याचे तुकडे फिर्यादीचे अंगणात गेल्याने व फिर्यादीची पुतनी हीचे डावे पायाचे तळपायाला गडुन ती जखमी झाल्याने मा. जिल्हा दंडाधिकारी सा. भंडारा यांचे अधिसुचना कलम ३७(१)(३) मपोकाचे उल्लघंन केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२३ भादवी. १३५,१३३(१)(ब)(८),१३१(अ)(३१) मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन विटाने कपाडावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी उमेश कोडाजी पोटफोडे वय ४० वर्ष, रा. रोहणा हा कनोजेच्या घराजवळ बसला असता यातील आरोपी हा मोटार सायकलने आला व त्याचे समोरी आपली मोटार सायकल उभी केली तेव्हा त्यास मोटार सायकल बाजुला घे म्हटले असता आरोपीने फिर्यादीस बांधीत ढकलले व विटाने कपाडयावर उजवे बाजुला मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**७) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे १५.०० ते १५.५८ वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही मानेगाव कडुन तहसील चौक लाखनी एनएच ६ रोडने जात असता मोटार सायकल ही भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन सिंधी लाईन चौकाचे कडेला एनएच ६ रोडचे डावे बाजुला फिर्यादीचे वडील भिवा आत्माराम मस्के वय ६० वर्ष, रा. कन्हाळगाव हे उभे असतांना त्यास धडक मारुन दोन्ही पायाला व उजवे हाताला दुखापत केल्याने फिर्यादी श्रीराम भिवा मस्के वय ३२ वर्ष, रा. कन्हाळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**८) मोटार सायकल स्लीप होवुन जखमी होवुन औषधापचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १४/१०/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीकांत महादेव बांबोडे वय ३१ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड पहेला हा दिनांक १४/१०/२०१७ ला मोटार सायकलने आपले वडीला सोबत भंडारा कडुन पहेला कडे जात असतांना बोरगाव गावाजवळ मोटार सायकल ही स्लीप होवुन पडल्याने जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु भंडारा येथे आकस्मीत विभागात आणले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो. वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. येळमाचे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. भोंगाडे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**९) अवैध दारू अंडयावर धाडी . :–**

दिनांक १७/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा व तुमसर येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून २० लिटर हातभट्टी दारू+ १०५ किलोसडवा मोहा+ साहित्य किंमती ८,३५०/–रु., तसेच ९०० मिली लिटर विदेशी दारु+ नगदी २०० /–रु. किंमती ९७५/–रु. असा एकुण किंमती ९,३२५/–रु चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १७/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.